# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली दिनांक ०९/०९/२०१७

## भुसुरूंग निकामी करण्यात पोलीस दलास यश

- (पोलीसांच्या सतर्कतेने टळली जिवीत हानी)

आज दिनांक ०९/०९/२०१७ रोजी उपविभाग भामरागड अंतर्गत येणाऱ्या पोमके धोडराज हद्दितील धोडराज भामरागड या मार्गावरील मौजा मेडपल्ली या रस्त्यावर नक्षलवादयांनी घातपात घडवून आणण्याच्या उद्देशाने भुसूरूंग लावल्याची बातमी पोमके धोडराज पोलीसांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे धोडराज पोलीस व सिआरपीएफ सी/३७ बटालीयन यांनी शोध मोहिम राबवून घटनास्थळाची पाहणी केली असता भुसूरूंग सदृश्य वस्तू दिसून आली. सदर माहिती वरीष्ठांना कळविण्यात आली.

मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरीक्त पोलीस अधिक्षक श्री. महेंद्र पंडीत, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. समीरसिंग साळवे आणि गडचिरोली बॉम्ब शोधक व नाशक पथक तयार करून तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आली. बॉम्ब शोधक पथकाने तपासणी केली असता साधारण २ किलो वजनाचा भुसूरूंग असल्याचे माहिती निदर्शनास आली. भुसूरूंग बॉम्ब शोधक व नाशक पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षतेची सर्व काळजी घेत सदर जागेवरच निकामी करण्यात पोलीसांना यश आले.

गडचिरोली पोलीस दलाच्या सर्तकतेमुळे पुन्हा एकदा नक्षलवादयांच्या घातपातास परतून लावण्याची कामगिरी गडचिरोली पोलीस दलामार्फत करण्यात आली. परीसरातील जनतेकडून पोलीस दलाच्या कामगिरीचे सर्वस्तरातून कौतूक होत आहे.